प्रकरण एक :

# प्रास्ताविक व अभ्यासपध्दती

## १.१ प्रास्ताविक :

देशात सहकार चळवळ सुरु होवून ९० वर्षे झाली. या कालखंडात ती वाढली, विस्तारली, आणि महाराष्ट्रात तर ती अधिक बहरली. भारतात ६५ टक्के लोकसंख्या आजही शेतीवर अवलंबून आहे. हा सर्व समाज खेड्यात रहात आहे. त्याचबरोबर हा सर्व ग्रामीण समाज देशभर विखुरलेला आहे. म्हणून ग्रामीण विकासासाठी अधिक चांगला, सर्वांना न्याय देणारा, सर्वांना सहभागी करुन घेणारा सहकार चळवळीचा मार्ग हाच खरा राजमार्ग आहे. म्हणूनच सहकारी संस्थाही आधुनिक समाजमंदिरे बनलेली आहेत. जगामध्ये सर्वच देश एकमेकांवर अवलंबून आहेत. त्याच प्रमाणे भारतातील ग्रामीण समाज व सहकार हे एकमेकांशी निगडीत आहेत.

१९६९-७० पासून सहकार चळवळीच्या काही क्षेत्रात नेत्रदीपक प्रगती झालेली आहे. विशेषत: बँकांच्या राष्ट्रीयकरणानंतर त्यांनी शेती क्षेत्राच्या कर्ज पुरवठ्यात केलेले पदार्पण, सहकार कायद्यातील सुधारणा, पीक कर्ज योजना, क्रेडिट कर्ज योजना, सहकारी संस्थांच्या विकासासाठी रिझर्व्ह बँकेचे योगदान, या सर्वांचा परिणाम ग्रामीण भागातील एकमेव आशास्थान असलेल्या विविध सेवा संस्थेवर झाला आहे. त्यामधील एक सेवा संस्था, सांगली जिल्ह्यातील अग्रगण्य संस्था, **नांद्रे विविध कार्यकारी सहकारी संस्था** होय.

भारतात शेती विकासासाठी, शेती अुत्पादन वाढीसाठी अनेक प्रयत्न झालेले आहेत, व आजही होत आहेत. यासाठी काही व्यक्तींचे व काही सहकारी संस्थांचे योगदान लाभलेले आहे. देशातील विविध भागात

व प्रदेशात सर्वसाधारणपणे त्यांच्या समस्या व परिस्थिती समान आहे. यासाठी अनेक प्रकारचे संशोधन झालेले आहे व चालू आहे, म्हणून संशोधनासाठी सांगली जिल्ह्यातील नांद्रे या गावातील शेतक-यांचा अभ्यास करणे ठरविले. नांद्रे येथील रहिवाशी असल्यामुळे नांद्रे विविध कार्यकारी सहकारी संस्थेच्या सभासदाचे अभ्यास करणे सोयीचे वाटले. विशेषत: ह्या संस्थेची स्थापना १९१६ मध्ये झालेली आहे. तसेच या संस्थेनी अलीकडे केलेले विकासाचे काम उल्लेखनीय आहे. त्यामुळे या संस्थेच्या कार्याचे अवलोकन करणे ठरविले.

संशोधन करीत असताना व्यक्तिनिष्ठ घटक बाजूला ठेवून आपले पुर्वग्रह आड येणार नाहीत याची दक्षता घेतलेली आहे, असे मला नम्रपणे नमूद करावेसे वाटते. वस्तूनिष्ठ प्रश्न तयार करून जी माहिती प्रत्यक्षपणे गोळा केली त्याच्या आधारे निष्कर्ष मांडले आहेत. हा प्रबंध निरिक्षण, पहाणी, मुलाखत, प्रश्नावली इत्यादी तंत्राचा अवलंब करून तयार केलेला आहे. संशोधन मार्गदर्शकांच्या मदतीने एक प्रश्नावली तयार केलेली आहे. प्रत्यक्ष मुलाखत घेऊन व त्याचवेळी निरिक्षण व पाहणी करून नोंदी केल्या.

## १.२ अभ्यासाची उद्दिदष्टे :

नांद्रे विविध कार्यकारी सहकारी संस्थेच्या सभासदांचे सामाजिक व आर्थिक परिस्थितीचा अभ्यास करणे हे स्थूलमानाने उद्दिदष्ट असले तरी त्याचा तपशील पुढीलप्रमाणे सांगता येईल.

१] सभासदांच्या भौगोलीक क्षेत्रांचे वर्णन करणे.

२] सभासदांच्या जिराईत व बागायत पीकांची माहिती घेणे.

३] जिराईत व बागायत पीकावरील कर्ज, खर्च, उत्पादन, नफा-तोटा याचा अभ्यास करणे.

४] सभासदांच्या पुरक व्यवसायातील उत्पादन खर्च याचा आढावा घेणे.

५] सभासदांचे या संस्थेचे सभासद होण्यामागे हेतू जाणून घेणे.

६] सभासदांच्या शेतीला पाणीपुरवठा सोयीबाबतची माहिती मिळविणे.

७] शेती उत्पादनासाठी या संस्थेकडून व इतर क्षेत्राकडून घेतलेल्या कर्जाचा आढावा घेणे.

८] सभासद कुटूंबातील शिक्षणाबाबतचा अभ्यास करणे.

९] नांद्रे गावाची भौगोलीक व सामाजिक परिस्थितीचे अवलोकन करणे.

१०] नांद्रे विविध कार्यकारी सहकारी संस्थांकडून सभासदांना मिळणा-या सेवांची माहिती घेणे.

११] नांद्रे विविध कार्यकारी सहकारी संस्थेची १९१६ ते १९९३ या काल-खंडातील कार्याची माहिती घेणे.

वरील उद्दिदष्टांना अनुसरून तयार केलेल्या प्रश्नावलीच्या आधारे सभासदांच्या मुलाखती घेतल्या. मुलाखती प्रामुख्याने एप्रिल - मे १९९३ या महिन्यात घेतल्या. प्रत्येक मुलाखतीसाठी १ तास वेळ लागला.

## १.३ समस्येचे स्वरुप :

नांद्रे विविध कार्यकारी सहकारी संस्थेची स्थापना होवून ७८ वर्षे झाली. या संस्थेच्या स्थापनेमुळे सभासदांच्यावर काही आर्थिक व सामाजिक परिणाम झालेले आहेत ते पुढीलप्रमाणे सांगता येईल.

१] सावकारी पध्दत बंद झाली. या पध्दतीमुळे शेतक-यांची आर्थिक पिळवणूक होत होती ती बंद झालेली आहे.

२] आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील सभासदांना पशुपालन खरेदीसाठी मध्यम मुदतीचा कर्ज पुरवठा उपलब्ध झाला.

३] पीक कर्ज प्रकारामुळे कर्जाचा उपयोग उत्पादन कारणासाठी होऊ लागला.

४] शेतीला पाणी पुरवठ्यासाठी दिर्घ मुदतीचा कर्जपुरवठा उपलब्ध झाला.

५] स्वस्त धान्य सेंटरमुळे कमी दरामध्ये वस्तूचा उपभोग घेता येऊ लागला.

६] सभासदांच्या एकूण उत्पन्नात व खर्चात वाढ झाली.

या संस्थेमुळे वरील गोष्टीचे परिणाम सभासदांच्यावर झालेला आहे.

## १.४ अभ्यास पध्दती :

हा प्रबंध निरिक्षण, मुलाखत, पाहणी इत्यादी तंत्रांच्या सहाय्याने तयार केला आहे. संशोधन मार्गदर्शकाच्या सहाय्याने एक व्यापक अशी प्रश्नावली तयार केली. प्रश्नावलीच्या सहाय्याने मुलाखत घेऊन त्याचवेळी निरिक्षण व पाहणी करुन नोंदी केल्या. त्यामुळे ही अनुसुची पध्दत [ ] वापरली असे म्हणता येईल.

या पध्दतीचे पुढीलप्रमाणे उद्देश असतात.

१] प्रश्नावलीत बदल केला जात नाही.

२] सर्व गोष्टीचा समावेश करुन प्रश्नावलीला परिपूर्णता आणणे.

वरील उद्देश प्रबंधात साध्य करण्यासाठी प्रयत्न केलेला आहे.

या पध्दतीमधील दक्षता पुढीलप्रमाणे सांगता येईल.

१] या पध्दतीमधून पूर्वग्रह-हीन व सत्य अशीच माहिती मिळविणे.

२] अचूक शब्दयोजना की त्यामध्ये त्रुटी राहणार नाही.

३] या माहितीची संख्याशास्त्रीय विश्लेषण करता आले पाहिजे.

४] या माहितीचे सारणीकरण करता आले पाहिजे.

संशोधनासाठी माहिती मिळविताना वरील दक्षता घेतलेली आहे. माहिती गोळा करीत असताना नमूना पध्दत [ ] या पध्दतीचा वापर केलेला आहे. नांद्रे विविध कार्यकारी सहकारी संस्थेचे १९९२ मधील सभासदांची संख्या १६७४ इतकी होती. या सर्व सभासदांची मुलाखत घेणे आवश्यक वाटले नाही कारण, नमूना निवड – पध्दतीने निवडलेले सभासद व संस्थेचे एकूण सभासदातील निष्कर्ष सारखेच असतील अशी धारणा झाली. तसेच संशोधन कालावधीसाठी असणारी वेळेची मर्यादा, व सभासदाच्या जवळ असलेली वेळ विचारात घेतलेली आहे. एकूण सभासदापैकी नमून्यासाठी १०० सभासदाची मुलाखती घेतलेले आहे. या नमुना पध्दतीला कोटा पध्दती [ , ] असे म्हटले जाते. सामान्यत: जेंव्हा निष्कर्षात फारशी विविधता येण्याची शक्यता नसते व एकूण लोकसंख्या बरीच जास्त असते तेंव्हा या पध्दतीचा वापर केला जातो.

**प्रबंधाची मांडणी :**

संशोधनासाठी १०० सभासदांची मुलाखती घेतल्या नांद्रे व नावरसवाडी या दोन्ही गावातील लोकसंख्येचा विचार करुन नांद्रे मधील ८५ सभासद व नावरसवाडी येथील १५ सभासदांची मुलाखती घेतल्या. या संस्थेमधील अनुसुचीत जाती जमातीचे प्रमाण लक्षात घेऊन एकूण नमुण्यातील १५ सभासदांची मुलाखती घेतल्या.

संशोधन करीत असताना प्रस्तुत प्रबंधात ५ प्रकरण दिलेले आहे. ते पुढीलप्रमाणे सांगता येईल.

१] प्रास्ताविक व अभ्यास पध्दती.

२] सहकार तत्वे, उगम आणि विकास - या प्रस्तुत प्रबंधात सहकार तत्वे, उगम व विकास याची माहिती दिलेली आहे. तसेच या प्रकरणात भारतातील/महाराष्ट्रातील सांगली जिल्ह्यातील सहकार चळवळीचा उगम व विकास याची माहिती दिलेली आहे.

३] या प्रकरणात नांद्रे गावाची भौगोलिक रचना, लोकसंख्या, सह.संस्था सामाजिक सेवा करणा-या संस्था इत्यादी माहिती दिलेली आहे. याशिवाय प्रबंधाच्या प्रमुख विषयाची म्हणजेच नांद्रे विविध कार्यकारी सहकारी संस्थेची १९१९ ते १९९३ या कालातील प्रगतीचा आढावा घेतला आहे.

४] सदर प्रकरणात या संस्थेच्या सभासदांची कौटूंबिक माहिती, धारण क्षेत्राचे आकारमान, उत्पन्न, खर्च, पशुधन, कर्जबचत, शेतीला पाणी-पुरवठा इत्यादी माहिती दिली आहे. तसेच या संस्थेकडून सभासदांना कोणकोणत्या सेवा पुरविल्या याची माहिती दिली आहे

५] शेवटच्या प्रकरणामध्ये नमुन्यातील सभासदांच्या मुलाखती व निरिक्षणा-वरून निष्कर्ष व शिफारस केलेली आहे.

अभ्यासाविषयी लागणारी प्राथमिक आकडेवारी व माहिती मुलाखत व प्रश्नावली या स्वरूपात गोळा केली. तसेच प्रबंधासाठी लागणारी दुय्यम आकडेवारी नांद्रे विविध सहकारी संस्थेच्या वार्षिक अहवालावरून गोळा केलेली आहे. तसेच ग्रामपंचायत, निरनिराळ्या सहकारी संस्था, सहकार उपनिबंधक कार्यालय, जिल्हा सांख्यकी कार्यालय या ठिकाणाहून गोळा केलेली आहे. या प्रबंधाची मांडणी करीत असताना ग्रंथालयाच्या उपयोग

[illegible] ग्रंथालयाचा उपयोग केलेला आहे. सांख्येकी विश्लेष - णासाठी प्रमाण व शेकडेवारी इत्यादीचा वापर केलेला आहे.